महाराष्ट्र शिक्षण सेवा, विधी अधिकारी, गट-ब या पदावर सरळसेवा प्रवेशाने नियुक्ती करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकःससेप्र-४४१८/प्र.क्र.१४७/प्रशा-२**
मादम कामा रोड, मंत्रालय, मंबुई- ४०० ०३२
दिनांक : १६ एप्रिल, २०१९

वाचा- १. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्रमांक : २२६१/(११)(२६८०)/दहा, दिनांक ६ जून, २०१८

२. शासन निर्णय समक्रमांक दिनांक ३० ऑगस्ट, २०१८

३. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्रमांक: २२६१/(११)(२६८०)/दहा, दिनांक १० जानेवारी, २०१९

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र लोक सेवा आयोगाने संदर्भाधीन दिनांक १० जानेवारी, २०१९ च्या पत्रान्वये महाराष्ट्र शिक्षण सेवेतील विधी अधिकारी, गट-ब या पदावर नामनिर्देशनाद्वारे श्रीमती रूक्साना शामसुद्दीन हकीम यांच्या नावाची शिफारस केली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारशीस अनुसरून श्रीमती रूक्साना शामसुद्दीन हकीम यांना महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतन नियम- २०१९ (सातवा वेतन आयोग) अनुसार एस-१६ या स्तरावर रू.४४,९००/- या मूळ वेतनावर पुढील कोष्टकात स्तंभ क्र. (६) मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी विधी अधिकारी, गट-ब या पदावर २ वर्षाच्या परिविक्षा कालावधीसाठी नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा प्रवर्ग | निवड झालेल्या प्रवर्गाकरिता शिफारस | दि.१६ जून, २०१७ च्या अधिसूचनेन्वये वाटप केलेला महसूली विभाग | नियुक्ती नंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | श्रीमती रूक्साना शामसुद्दीन हकीम, लब्बेक को-ऑप.हौ. सोसायटी, एफ/१, ए विंग, व्यायामशाळा लेन, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड | खुला | अराखीव (महिला) उमेदवार उपलब्ध नसल्याने राखीव असलेल्या पदासाठी | नागपूर | विधी अधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर |

२. सदर पदस्थापना खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(१) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसूचना क्रमांक : एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/-कार्या.१२ दिनांक २८ एप्रिल, २०१५ नुसार "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" व त्यानंतर त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेली सुधारणा ह्या वरील उमेदवारांस लागू राहतील.

(२) संबंधित उमेदवार हे दोन वर्षाकरिता विधी अधिकारी या पदांवर परिविक्षाधीन अधिकारी म्हणून कार्यरत राहतील. परिविक्षाधीन कालावधीत त्यांना प्रचलित नियमाप्रमाणे आवश्यक असणारी विभागीय परिक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल. तसेच परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण करणे आवश्यक आहे. परिविक्षाधीन कालावधीत त्यांनी कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा विहित विभागीय परीक्षा उत्तीर्ण न केल्यास, कोणतीही पूर्वसूचना न देता, त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

(३) उपरोक्त उमेदवारांनी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/- २००१/३९, दिनांक १९ मार्च, २००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहीत मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही, तर उक्त कालावधी संपताच त्यांच्या सदर पदावरील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल. तसेच त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम, १९९९ व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा लागू राहतील.

(४) उपरोक्त उमेदवाराची नियुक्ती, सरळसेवा प्रवेश नियुक्तीसाठी विहीत केलेल्या नियमांच्या अधीन राहून ते यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

(५) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ नुसार परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील तरतुदी सदर उमेदवारांना लागू राहतील.

(६) संबंधित उमेदवारांनी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेबाबत व इतर आवश्यक प्रमाणपत्रे मूळ प्रती तपासणी करीता व साक्षांकित प्रतींचा संच पदस्थापना स्विकारण्याच्या वेळी संबंधित कार्यालय प्रमुख/नियंत्रण अधिकारी यांच्याकडे सादर करावा आणि

कार्यालय प्रमुख/नियंत्रण अधिकारी यांनी प्रमाणपत्रांची तपासणी करुन संबंधित उमेदवाराला रुजू करुन घ्यावे.

(७) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संबंधित उमेदवारांनी सादर केलेली सर्व कागदपत्रे संबंधित सक्षम यंत्रणेमार्फत तपासण्याच्या सूचना केलेल्या आहेत. त्यामुळे तपासणीअंती उमेदवारांनी सादर केलेली कागदपत्रे खोटी अथवा बनावट आढळल्यास त्यांच्या सेवा कुठलीही पूर्व सूचना न देता तात्काळ संपुष्टात आणण्यात येतील.

(८) संबंधित उमेदवारांनी या आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांत नियुक्तीच्या पदावर रुजू व्हावे व याबाबतचा अहवाल संबंधीत कार्यालय प्रमुखाने आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा. विहित कालमर्यादेत रुजू न होणाऱ्या उमेदवारास सदर नियुक्तीमध्ये स्वारस्य नसल्याचे समजण्यात येईल आणि सदर नियुक्तीकरीता संबंधित उमेदवारांचा हक्क आपोआप संपुष्टात येईल.

(९) शासकीय सेवेत रुजू झाल्यानंतर जर उमेदवारास शासकीय सेवेतून राजीनामा द्यावयाचा असेल तर त्यांनी एक महिन्याची पूर्वसूचना शासनास देणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांना एक महिन्याचे वेतन शासनाकडे जमा करावे लागेल.

(१०) उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवास भत्ता देण्यात येणार नाही.

(११) वर नमूद केलेल्या अटी व शर्ती व्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांना लागू असलेले प्रचलित नागरी सेवा विषयक सर्वसाधारण नियम सदर उमेदवारांना लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०४१६१४३७३३७९२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2019.04.16 14:49:43 +05'30'

(र.प्र. आटे)

**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) आयुक्त (शिक्षण) शिक्षण आयुक्त यांचे कार्यालय, म.रा.पुणे

२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

३) सर्व संचालक

४) महालेखापाल (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई/नागपूर

६) सर्व प्रादेशिक विद्या प्राधिकरण प्रमुख

७) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक

८) सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सात्तत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था

९) सर्व शिक्षणाधिकारी

१०) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर

११) श्रीमती रूक्साना शमसुद्दीन हकीम, लब्बेक को-ऑप.हौ. सोसायटी, एफ/१, ए विंग, व्यायामशाळा लेन, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

१२) निवडनस्ती

**प्रत माहितीसाठी,**

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

२) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

३) उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,बॅक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१. (माहितीकरिता) पत्राद्वारे